महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

सांगली सिव्हिल हॉस्पीटलमध्ये बदली कामगारांना कायम स्वरुपी करण्याबाबत

(१) ४८७६ (१५-०१-२०१५). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील सांगली सिव्हिल हॉस्पीटलमध्ये गत ३० वर्षापासून काम करीत असलेल्या बदली कामगारांना कायम स्वरुपी करण्याबाबत मागील काही दिवस आंदोलनाच्या माध्यमातून व शासनाकडे पत्रव्यवहाराच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, या कामगारांना कायमस्वरुपी करण्याबाबत शासनाकडून काहीच प्रयत्न होत नसल्याने सदर कामगरांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला असून त्यांचा परिणाम हॉस्पीटलमधील रुग्णांवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे कायमस्वरुपी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०३-२०१६) :(१) हे अंशतः खरे आहे.

सांगली जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय हे पद्मभुषण वसंतदादा पाटील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सांगली या महाविद्यालयाशी संलग्नित असून मिरज व सांगली येथे ५९ बदली कामगार कार्यरत होते.

(२) व (३) विभागाच्या नियंत्रणाखालील एकूण १४ शासकीय महाविद्यालये व रुग्णालयातील वर्ग-४ संवर्गातील ७७४ बदली कर्मचा-यांपैकी ६२६ पात्र बदली कर्मचा-यांच्या सेवा शासन निर्णय क्र.न्यायाप्र-०११५/प्र.क्र.३८/१५/वैसेवा-४, दि.७.१२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये नियमित करण्यात आल्या आहेत. सदरहू आदेशामये सांगली, मिरज येथील ४६ पात्र बदली कामगारांना नियमित करण्यात आले असून १३ कामगार अपात्र ठरलेले असल्यामुळे त्यांच्या सेवा नियमित करण्यात आलेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विद्यापीठस्तरीय योग अभ्यासक्रमांना मान्यता देवून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना अनुदान देण्याची केलेली मागणी

(२) १४६८५ (०९-०४-२०१५). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विद्यापीठस्तरीय योग अभ्यासक्रमांना मान्यता देवून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना अनुदान द्यावे अशी मागणी सदर लोकप्रितनिधीनी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२२-०२-२०१६) :(१) होय.

(२) व (३) विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२ व ८३ यान्वये नवीन महाविद्यालय अभ्यासक्रम/विद्याशाखा इत्यादींना मान्यता देण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार विद्यापीठांकडून अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. प्रस्ताव प्राप्त झाल्यांनंतर व शासनाने विहित केलेल्या मान्यता निकषांनुसार पात्र ठरल्यास मान्यता प्रदान केली जाते. मात्र, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी नविन महाविद्यालयांना मान्यता न देण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला आहे.

औरंगाबाद शहरातील काही इंग्रजी माध्यमाच्या शाळांची शैक्षणिक सत्र सुरु असतांनाच प्रवेश प्रक्रिया सुरु केल्याबाबत

(३) १५८१९ (०९-०४-२०१५). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील काही इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे शैक्षणिक सत्र सुरु असतांनाच प्रवेश प्रक्रिया सुरु केली असून सदर प्रवेश प्रक्रिया जाहिरातबाजी करुन सुरु करण्यात आली असतांनाही याकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष शिक्षण हक्क कायद्यानुसार माहे जून मध्ये सुरु होते व प्रवेश प्रक्रिया शाळा सुरु झाल्यावर राबविणे हे बंधनकारक असताना शासनाच्या आदेशाला न जुमानता काही संस्थाचालक हे सर्रास जाहिराती देऊन व शहरामध्ये मोठे होडिंग्ज लावून प्रवेश प्रक्रिया करित आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या संस्था चालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१६) :(१) व (२) अंशतः खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी केली असता, पूर्व प्राथमिक वर्गातील प्रवेश प्रक्रिया माहे एप्रिल, २०१५ मध्ये सुरु केली असल्याचे निदर्शनास आले आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यातील बहुतांशी शाळांमध्ये विविध सुविधा नसल्याबाबत

(४) १५९१२ (०९-०४-२०१५). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील बहुतांशी जिल्हा परिषद, नगरपालिका, खाजगी शाळांमध्ये स्वच्छता गृह, पिण्याचे पाणी, खेळाचे मैदान, वीज इत्यादी सुविधा नसल्याची वस्तुस्थिती माहे जानेवारी, २०१५ मध्ये उघडकीस आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये विविध सुविधा तात्काळ उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१६) :(१) अंशतः खरे आहे.
अकोला जिल्ह्यातील काही शाळांना खेळाचे मैदान उलपब्ध नाही व काही शाळांना वीज पुरवठा होत नाही.
(२) ज्या शाळांना खेळाचे मैदान उपलब्ध नाही. त्या शाळांना जवळच्या परिसरातील ग्रामपंचायत/ नगरपरिषद/महानगरपालिका/खाजगी जागा तात्पुरत्या स्वरुपात मैदानासाठी उपलब्ध करण्याबाबत शासन निर्णय, दिनांक २९/०६/२०१३ नुसार निदेश दिले आहेत.त्यानुसार शाळांनी कार्यवाही करावयाची आहे. ज्याशाळांचा वीज पुरवठा खंडीत झाला आहे. त्यांना वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत निदेश दिले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील स्थलांतरीत कुटुंबातील पाल्यांसाठी चालविण्यात येणारे हंगामी वसतीगृह केवळ ४ तालुक्यातच सुरु असल्याबाबत

(५) १७१२५ (३०-०७-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील स्थलांतरीत कुटुंबातील पाल्यांसाठी चालविण्यात येणारे हंगामी वसतीगृह १६ तालुक्यापैकी केवळ ४ तालुक्यातच सुरु असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थलांतरीत कुटुंबातील पाल्यांसाठी हंगामी वसतीगृह चालविली जात असुन या वसतीगृहात किमान २० विदयार्थी असणे आवश्यक आहे तसेच शासनाकडून प्रति विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनासाठी १ हजार १५० रुपये दरमहा दिले जात आहे, हे खरे आहे काय,

(३)असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात येत असून आजतागायत ३० ते ३५ तपासणीचे अहवाल विभागाला प्राप्त झाले असून त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०३-२०१६) :(१) ४ तालुक्यातील प्रस्ताव प्राप्त झाल्याने ४ तालुक्यात हंगामी वसतीगृहे सुरु करण्यात आली

(२) शासनाकडून वसतीगृहात रहाणाऱ्या विदयार्थ्यासाठी प्रति विदयार्थी रु. १३६६/- याप्रमाणे ६ महिन्यांसाठी दिले जातात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्हयात सन २०१० मध्ये झालेल्या ३१६ शिक्षण सेवकांना माहे मे, २०१५ अखेर नियुक्ती देण्यात आली नसल्याबाबत

(६) १८८६६ (०६-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात सन २०१० मध्ये झालेल्या ३१६ शिक्षण सेवकांना माहे मे, २०१५ अखेर नियुक्ती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व तदनुसार सदर शिक्षण सेवकांच्या त्वरीत नियुक्त्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

सन २०१० मध्ये प्राथमिक शिक्षक भरतीसाठी घेण्यात आलेल्या CET परीक्षेतील ३१६ उमेदवारांची पुर्नरपडताळणी नंतर अहमदनगर जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर नियुक्ती देण्यासाठी जानेवारी, २०१५ मध्ये शिफारस करण्यात आली होती. तथापी सदर उमेदवारांना नियुक्ती देण्याऐवजी सदर रिक्त पदांवर आंतरजिल्हा बदलीने नियुक्ती देण्याबाबत मा.न्यायालयात याचिका दाखल झाली. सदर याचिकेच्या निकालानंतर जून , २०१५ मध्ये सदर ३१६ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

उरण येथील (जि.रायगड) जिमखान्यांसाठी अद्ययावत क्रीडा संकुल उभारण्यासाठी जागा मिळणेबाबत

(७) १९८३६ (०६-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण येथील (जि.रायगड) जिमखान्यांसाठी अद्ययावत क्रीडा संकुल उभारण्यासाठी जागा मिळणेबाबत स्थानिक लोकप्रितिनिधींनी दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.क्रीडा व युवक कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापपर्यंत निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०२-२०१६) :(१) या विषयाबाबतचे दिनांक ३०.०७.२०१५ चे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड यांनी दिनांक १६.०२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये तालुका स्तरावर क्रीडा संकुल उभारण्याकरीता भूखंडाची मागणी सिडकोकडे केली आहे. त्यानुसार सिडको संचालक मंडळाने ठराव क्र.१११७८ नुसार द्रोणागिरी सेक्टर-५१ मधील भू.क्र.१२६+१२७+७२ शासन मान्यतेच्या आधीन राहून विना शुल्क वाटप करण्याची मंजूरी दिली आहे. त्यानुसार जागा प्राप्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यातील कामाच्या शोधात स्थलांतरीत झालेल्या गोरगरीब मजूरांच्या मुलांसाठी वसतिगृहे सुरु करण्यात आल्याबाबत

(८) २०८२७ (३०-०७-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील कामाच्या शोधात स्थलांतरीत झालेल्या गोरगरीब मजूरांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नये, म्हणून शिक्षण विभागाकडून हिंगोली जिल्ह्यात एकूण ८० वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत हे खरे आहे,

(२) असल्यास शासनाने याकरीता आवश्यक निधीही मंजूर केला, तसेच काही वसतिगृहे बंद करण्यात आली आहेत ,हे ही खरे काय,

(३) असल्यास, आवश्यक सुविधा न देण्याचे आदेश ज्या वसतिगृहांनी पाळले नाहीत त्याचेवर शिक्षण अधिका-यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०३-२०१६) :(१) व (२) होय. ८० हंगामी निवासी वसतीगृहे ६ महिने कालावधीकरीता सुरु करण्यात आली होती. वसतीगृहाचा कालावधी संपल्यानंतर वसतीगृहे बंद करण्यात आली आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्य खंडाच्या मुद्रीतांची समितीने तपासणी न केल्याबाबत

(९) २२०९८ (३१-०७-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्य खंडाच्या मुद्रीतांची तपासणी गेल्या ९ वर्षापासून सुरु असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधीची कोणतीही कमतरता नसताना केवळ तपासणीचे कारण सांगून सदरील मुद्रितांची समितीने अद्याप तपासणी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :(१) हो.

(२) होय. मुद्रित शोधक नसल्यामुळे मुद्रिते तपासली गेली नाहीत.

(३) व (४) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१०/०२/२०१५ रोजी झालेल्या समितीच्या बैठकीत मुद्रित शोधकांची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे घेण्याबाबत चर्चा झाली. त्यानुसार मुद्रित शोधकांची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यात आली असूनर, सध्या समितीकडे दोन मराठी आणि ए इंग्रजी अशा तीन मुद्रित शोधकांची सेवा उपलब्ध झाली असून प्रलंबित कार्यास वेग देण्यात येत आहे.

माण तालुक्यातील जि.सातारा येथील जिल्हापरिषद शाळा प्रिंपी (राजगे) ची जुनी शालेय इमारत मोडकळीस आल्याबाबत

(१०) २७०४० (१७-०७-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण तालुक्यातील जि.सातारा येथील जिल्हापरिषद शाळा प्रिंपी (राजगे) ची जुनी शालेय इमारत मोडकळीस आली असून या या इमारतीचे छत ढासळले आहे त्यामुळे सदर इमारत धोकादायक झालेली आहे त्यामुळे मुलांना जीव मुठीत घेऊन शाळेत बसावे लागत असल्याचे माहे जून, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोकादायक इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

सदर इमारत धोकादायक झाली आहे. परंतु इमारत वापरात नसून या परिसरातील इतर शालेय खोल्यांमध्ये शालेय कामकाज चालत आहे.

(२) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत, नविन शाळा इमारत/ वर्गखोल्यांची मागणी करण्यात आली आहे. नवीन इमारत/वर्गखोलीसाठी निधी मंजूर केल्यावर बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आर्थिक आणि दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या २५ टक्के आरक्षणातून पूर्व प्राथमिकच्या वर्गाना वगळण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत

(११) २८२९१ (२४-११-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण संस्था चालकांच्या आडमुठेपणामुळे शिक्षण हक्क कायद्यानुसार राज्यातील आर्थिक आणि दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या २५ टक्के आरक्षणातून पूर्व प्राथमिकच्या वर्गाना वगळण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निर्णयामुळे सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून शाळांनी नर्सरी, छोटा शिशु, मोठा शिशु या वर्गात २५ टक्के आरक्षणांतर्गत घेतलेले प्रवेश अनेक शैक्षणिक संस्थांनी रद्द करण्याच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वी छोटा शिशु व मोठा शिशुच्या प्रवेशासाठी ठरविण्यात आलेल्या निकषानुसार २५ टक्के आरक्षणासाठी दोन एंट्री पॉईंट होते, तथापि शासनाच्या उपरोक्त निर्णयामुळे एकमेव एंट्री पॉइंट असल्यामुळे नर्सरी व केजी प्रवेशामध्ये खाजगी शाळांना आता पूर्वीप्रमाणेच देणगी,शुल्क आणि इतर निधीच्या नावाखाली पालकांची मनमानी लूट करण्याचा परवाना मिळाला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशाच्या मुद्यावर तोडगा काढण्यासाठी दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजी पुणे येथील राजीव गांधी लर्निंग स्कूलमध्ये झालेल्या बैठकीत शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी नरमाईची भूमिका घेतल्याने संस्थाचालकांनी त्यांना पाठविलेल्या नोटीसाबाबत विचारणा केली असता शिक्षण उपसंचालकांनी त्यांना या नोटीसा फार गांभीर्याने घेऊ नका असे सांगितले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाच्या उपरोक्त निर्णयामुळे हजारो गरिब मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षणापासून वंचित रहावे लागणार आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) सदर विषयाबाबत मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार दिनांक ३० एप्रिल, २०१५ चा शासन निर्णय रद्द करुन दिनांक २१ जानेवारी, २०१५ च्या शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) व (५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील खाजगी शाळांमध्ये शिक्षक भरती सीईटी माध्यमातून करणेबाबत

(१२) २८६१८ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी शाळांमधील शिक्षकांची भरती शिक्षक पात्रता परीक्षा (सीईटी) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची सामाईक प्रवेश परीक्षेच्या (सीईटी) माध्यमातून भरती करण्यात येणार असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, सदर शिक्षकांची भरती सामाईक प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केले वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०३-२०१६) :(१) व (२) सद्यस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षकांची भरती सामुहिक प्रवेश परीक्षेद्वारे (CET) करण्यात येत असून खाजगी संस्थांमधील शिक्षकांची भरतीसुध्दा अशाच परीक्षेद्वारे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. या परिक्षेत फक्त TET पास उमेदवार बसण्यास पात्र राहतील, असे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय स्तरावरील धनुर्विद्या यामध्ये महाराष्ट्राचे नाव उज्वल करणाऱ्या कुमार नामदेवराव इंगोले या उच्चशिक्षित बेरोजगार तरुणास शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

(१३) २८८९३ (२२-१२-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आशियायी खेळांच्या स्पर्धेत ४ सुवर्ण पदके मिळवून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील धनुर्विद्या यामध्ये महाराष्ट्राचे नाव उज्वल करणाऱ्या कुमार नामदेवराव इंगोले या

उच्चशिक्षित तरुणास शासन सेवेत सामावून घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी अचलपूर यांनी दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा उच्चशिक्षित गुणवंत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करून भारतीय धनुर्विद्येचा नाव लौकिक वाढविणाऱ्या बेरोजगार तरुणास तातडीने शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व किती कालावधीत अपेक्षीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०२-२०१६) :(१) कुमार नामदेवराव इंगोले या खेळाडूस शासन सेवेत सामावून घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे शिफारस केली नाही. तथापि, या विषयासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी कुमारी नितु नामदेवराय इंगोले या खेळाडूस शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शिफारस केली आहे.

(२) दिनांक ०९ डिसेंबर, २०१० च्या शासन निर्णयानुसार राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार थेट नियुक्तीसाठी संचालनालयाने सादर केलेल्या प्रस्तावात कुमारी नितु इंगोल यांच्या अर्जाचा समावेश आहे. यासंदर्भात मा.मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीच्या विचारार्थ सदर प्रस्ताव ठेवण्यात आला होता. सदर समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने अंतीम शिफारस करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील गठीत करण्यात आलेल्या समितीसमोर विचारार्थ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिक्षण संचालक व उपसंचालक विभागातील कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचार प्रकरणाबाबत

(१४) २८९५१ (२१-०१-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक एन.बी.चौव्हाण यांच्यावर निलंबनाची कारवाई शिक्षण आयुक्तांनी केल्यानंतर त्याच पदावर तात्पूरता कार्यभार वाहणाऱ्या श्री.भीमराव फडतरे यांच्यावरही दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी शिक्षण आयुक्तांनी निलंबनाची कारवाई केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री भीमराव फडतरे यांच्यावर शिक्षण विभागात कोणता भ्रष्टाचार केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे,

(३) असल्यास ,सदर कारवाई करण्यापूर्वी त्यांची विभागीय चौकशी करण्यात आली आहे काय, विभागीय चौकशीत आढळून आलेल्या दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१६-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

श्री. एन.बी.चव्हाण हे तत्कालीन सहाय्यक संचालक व विभागीय उपसंचालक, मुंबई या पदावर कार्यरत असताना त्यांनी केलेल्या गंभीर अनियमितते प्रकरणी आयुक्त शिक्षण कार्यालयाने दिनांक ११.९.२०१५ च्या आदेशान्वये निलंबनाची कारवाई केली आहे. मात्र त्यावेळी श्री. एन.बी.चव्हाण हे उपसंचालक, बालचित्रवाणी, पुणे या पदावर कार्यरत होते.

श्री. बी.डी.फडतरे हे विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई या पदावर कार्यरत असताना त्यांनी केलेल्या गंभीर अनियमितते प्रकरणी त्यांचेविरुध्द आयुक्त शिक्षण कार्यालयाने दिनांक १५.९.२०१५ च्या आदेशान्वये निलंबनाची स्वतंत्र कारवाई केली आहे.

(२) श्री.फडतरे यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई या पदावर कार्यरत असताना कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचा-यांना नियमबाह्यरित्या वैयक्तिक मान्यता देणे, सन २०१५ या शैक्षणिक वर्षात मुंबई विभागासाठी राबविलेल्या इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रियेतील तिस-या फेरीनंतर अधिकार नसताना ऑनलाईन प्रवेश थांबविण्याचा घेतलेला निर्णय आणि अन्य प्रकारच्या गंभीर अनियमितता श्री.फडतरे यांनी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे.

(३) श्री.बी.डी.फडतरे यांनी केलेल्या गंभीर अनियमिततेप्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांचेकडून आयुक्त शिक्षण सविस्तर प्रस्ताव प्राप्त करुन शासनास पाठविणार आहेत. त्यानंतर तातडीने पुढील कार्यवाही केली जाईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शिक्षणाचा दर्जा सुधारणे व विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळावे या हेतूने शासन वेळोवेळी शैक्षणिक संस्था व महाविद्यालयाला परवानगी देत असलेबाबत

(१५) २९२०९ (२२-१२-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षणाचा दर्जा सुधारणे व विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळावे या हेतूने शासन वेळोवेळी शैक्षणिक संस्था व महाविद्यालयाला परवानगी देत असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ मध्ये एकूण किती अभियांत्रिकी महाविद्यालयाला परवानगी देण्यात आली त्यातील किती अभियांत्रिकी महाविद्यालय कार्यरत आहेत, त्यांची एकूण प्रवेश क्षमता किती आहे व या वर्षी साधारण त्यात किती विद्यार्थी शिक्षण घेत आहेत,

(३) असल्यास, या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयात यावर्षी प्रथम वर्ष व द्वितीय वर्षास एकूण किती विध्यार्थ्यांनी प्रवेश घेतला,

(४) असल्यास, एकूण प्रवेश क्षमता व प्रवेश झालेला आकडा पाहता मोठ्या प्रमाणात प्रवेश रिक्त राहत असल्यास यावर शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. विनोद तावडे (११-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेमार्फत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था/ महाविद्यालयांना परवानगी देण्यात येते.

(२) सन २०१५-१६ मध्ये एका अभियांत्रकी महाविद्यालयास परवानगी देण्यात आली आहे. एकूण प्रवेश क्षमता ३०० आहे. या वर्षी विद्यापीठाची संलग्नता नसल्याने एकही विद्यार्थी प्रवेशित नाही.

(३) एकही विद्यार्थी प्रवेशित नाही.

(४) एकूण प्रवेश क्षमता व प्रवेशित विद्यार्थी संख्या पाहता मोठया प्रमाणात प्रवेशाविना जागा रिक्त राहत असल्याने ती तफावत दूर करण्यासाठी बृहत आराखडयानुसार नविन संस्थांना मान्यता देणे/मुदतवाढ न देणे/द्वितीय पाळीस मंजूरी न देणे/ प्रवेशाक्षमता वाढ न देणे/ प्रत्येक संस्थेत प्रवेशाची कमाल मर्यादा निश्चित करणे/ रिक्त असलेल्या जागांचा आढावा घेऊन संबंधित संस्थेची प्रवेश क्षमता कमी करणे, तसेच ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये ३५ टक्क्यापेक्षा अधिक जागा रिक्त राहिल्या आहेत अशा महाविलयांना येत्या शैक्षणिक वर्षामध्ये मुदतवाढ देण्यात येऊ नये असे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेला प्रस्तावित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठात नियुक्त करण्यात आलेले परिक्षा नियंत्रक यांची मुदत संपुष्टात आल्याबाबत

(१६) २९५०६ (२२-१२-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठात निकाल प्रलंबित राहणे, पुनर्मुल्यांकनाला विलंब आणि परिक्षा विभागात गोंधळ सुरु असतानाच गेल्या वर्षी नियुक्त करण्यात आलेले परिक्षा नियंत्रक यांची मुदत १७ ऑगस्ट रोजी संपत असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिक्षा नियत्रंकानी विद्यापीठ प्रशासनाकडे मुदतवाढीसाठी अर्ज केला आहे तसेच विद्यापीठानेही शासनाकडे त्यांना मुदतवाढ देण्यासाठी शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिक्षा नियंत्रकांना मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, याबबत कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१६) :(१) मुंबई विद्यापीठात कार्यरत असलेले परीक्षा नियंत्रक यांची मुदत दिनांक १७.०८.२०१५ रोजी समाप्त होत आहे, हे खरे आहे,

(२) विद्यापीठाकडून असा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्याचे शासकीय अभिलेखावरुन आढळून आले नाही. तथापि, तत्कालीन परीक्षा नियंत्रकांनी दि.०६.०६.२०१५ च्या पत्रान्वये मूळ पदावरील धारणाधिकार दि.०६.०६.२०१९ पर्यंत वाढविण्यास शासनास विनंती केली होती. त्यावर निर्णय घेण्यापूर्वीच त्यांची मुदत दि.१७ ऑगस्ट, २०१५ रोजी संपुष्टात आल्यामुळे त्यांना कार्यमुक्त केले असून ते त्यांच्या मूळ आस्थापनेवर रुजू झाले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील मेयो शासकीय रुग्णालयातील इमारतीत आग नियंत्रणाची आवश्यकती उपकरणे बसविण्यासाठी

(१७) २९५२९ (२०-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेयो शासकीय रुग्णालयात दररोज शेकडो रुग्ण उपचारासाठी येत असून दुर्दैवाने येथे आगीची घटना घडलीच तर त्यापासून बचाव होईल अशी यंत्रणा नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणाची दखल घेऊन मेयो रुग्णालय प्रशासनाने रुग्णालयातील इमारतीत आग नियंत्रणाची आवश्यकती उपकरणे बसविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१८-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

मेयो रुग्णालयात आवश्यकतेप्रमाणे आग सुरक्षा उपकरणे पुरेश्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

(२) संस्थेचे फायर ऑडिट अग्निशमन विभाग, नागपूर महानगरपालिकेमार्फत करण्यात आले असून त्यांच्या सूचनेनुसार आग सुरक्षा व्यवस्थेत वाढ होण्याकरीता आवश्यकता उपाययोजना करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील ससुन रुग्णालय आवारात सहा महिन्यापूर्वी खासदार निधीतून बांधण्यात आलेले स्वच्छतागृह निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(१८) २९७११ (२२-१२-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससुन रुग्णालय आवारात सहा महिन्यापूर्वी खासदार निधीतून बांधण्यात आलेले स्वच्छतागृह निकृष्ट दर्जाचे असल्याने प्रशासनास नव्याने त्याची दुरुस्ती करावी लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी त्वरीत चौकशी करुन तद्नुसार दोषी आढळून आलेल्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील पदवी अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या ४० टक्के जागा भरण्याबाबत

(१९) २९८३१ (२०-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवी अभियांत्रिकीच्या ज्या महाविद्यालयांच्या ४० टक्के जागा भरल्या जात नाहीत अशा महाविद्यालयांच्या रिकाम्या राहण्याऱ्या तुकड्या बंद करण्याचा प्रस्ताव तंत्रशिक्षण संचालनालय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआसीटीई) देण्यात येणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या या निर्णयानुसार आतापर्यंत राज्यातील किती अभियांत्रिकी महाविद्यालयांवर कारवाई केली या करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे

ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये अल्प प्रवेश होत आहेत त्या अभियांत्रिकी महाविद्यालयांच्याबाबतीत उपाययोजना करण्यासंदर्भात अभिप्राय अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेला संचालक, तंत्र शिक्षण यांच्या स्तरावरुन दिनांक ३०/११/२०१५ रोजी व शासनस्तरावरुन दिनांक १३/०१/२०१६ रोजी कळविण्यात आले आहे.

(२) नविन संस्थेला मान्यता देणे/बंद करणे/ मुदत वाढ देणे इत्यादी बाबी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक औषधशास्त्र या रिक्त पदावर दोघांची नियुक्ती केल्याबाबत

(२०) २९९३७ (२२-१२-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक औषधशास्त्र या रिक्त पदावर दोघांची नियुक्ती केल्याचा प्रकार माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या या प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१०-०२-२०१६) :(१) होय. हे खरे आहे. अगोदर तात्पुरती नियुक्ती करुन पद भरण्यात आले. परंतु नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर सदर तात्पुरती नियुक्ती आपोआप संपुष्टात आली आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशीची आवश्यकता नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अभियांत्रिकी अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओढा वर्षानुवर्षे कमी होत असल्याबाबत

(२१) ३००५४ (२३-१२-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अभियांत्रिकी अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओढा वर्षानुवर्षे कमी होत असल्याने सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात अंदाजे ७० हजार जागा रिक्त राहिल्या असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीईटी परिक्षेत विद्यार्थ्याला मिळालेल्या गुणावर गुणवत्ता यादी (मेरिट) लावली जाते त्याऐवजी बारावीचे ५० टक्के गुण व सीईटीतील ५० टक्के गुण घेऊन मेरिट लावण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) होय.

प्रवेश प्रक्रिया माहे ऑगस्ट, २०१५ च्या अखेरीस पूर्ण झाल्यानंतर प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या ६४६२५ इतक्या जागा रिक्त राहिल्या आहेत.
(२) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी राष्ट्रीय स्तरावरील जेईई (मेन्स) च्या आधारे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यावेळी इयत्ता १२ वी मधील गुणांना ५० टक्के महत्तमाप व जेईई (मेन्स) च्या गुणांना ५० टक्के महत्तमाप देऊन गुणवत्ता यादी तयार करण्यात आली व त्यानुसार विद्यार्थ्यांकडून विकल्प मागवून प्रवेश करण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश हे राज्याच्या एचएचटी-सीईटी या सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार फक्त सामाईक प्रवेश परीक्षेतील गुणांच्या आधारे प्रवेश करण्यात येणार आहेत. त्यामुळे बारावीच्या गुणांना ५० टक्के महत्तमाप देऊन गुणवत्ता यादी तयार केली जाणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या लातूर उपकेंद्राला चांगला केअर टेकर नसल्याबाबत

(२२) ३००८८ (२३-१२-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या लातूर उपकेंद्राला चांगला केअर टेकर नसल्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची कमतरता तसेच अनेक सोयी सुविधांचा अभाव असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाचे उपकेंद्र हे लातूर शहरापासून १० ते १२ किमी अंतरावर असल्याने, सदरहू उपकेंद्रात जाण्या-येण्याकरिता विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या बससाठी गत सहा महिन्यापासून चालक नसल्याने विद्यार्थीची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे काय,

(४) नसल्यास, यामगील विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०२-०३-२०१६) :(१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या लातूर उपकेंद्रासाठी संचालकांची नियुक्ती करण्यात आली असून शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज पूर्ण करण्याकरिता आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध आहेत. तथापि, सध्या पदे भरण्यास निर्बध असल्यामुळे विद्यापीठातील शिक्षकेतर पदे रिक्त असून सदर पदे भरल्यानंतर काही पदे उपकेंद्राकडे वर्ग करण्यात येणार आहेत.

(२) विद्यापीठाकडे विद्यार्थ्यासाठी ठेवण्यात आलेल्या बससेवेला मागील दोन वर्षापासून फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने सदर बस मुख्यालयात ठेवण्यात आलेली आहे. बसवरील वाहन चालकांची सेवा परीक्षा आदि कामासाठी मुख्यालयात देण्यात येत आहे.

(३) विद्यार्थ्यांची मागणी आल्यास वाहन चालकांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करुन सदर बस सेवा पुन:श्च सुरु करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात नैसर्गिकपणे मातृत्व उपभोगणाऱ्या महिलाप्रमाणेच सरोगसीच्या माध्यमातून मातृत्व प्राप्त होणाऱ्या महिलांना ६ महिन्यांची सुट्टी मंजूर करण्याबाबत

(२३) ३०२६७ (२१-०१-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नैसर्गिकपणे मातृत्व उपभोगणाऱ्या महिलाप्रमाणेच सरोगसीच्या माध्यमातून मातृत्व प्राप्त होणाऱ्या महिलांना ६ महिन्यांची सुट्टी मंजूर करण्याबाबतचा निर्णय मा. शिक्षण मंत्री यांनी घेतला असल्याचे माहे ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत ४० वर्षे माध्यमिक शाळेत शिकवणाऱ्या शिक्षिकेने सरोगसीच्या माध्यमातून मुलाला जन्म देण्याचा निर्णय घेतल्याने सदर महिलेने सरोगेट मातेबाबतचे नियम स्पष्ट नसल्याने शाळेला कोणता निर्णय घ्यावा असा संभ्रम पडल्याने सदरील प्रकरण शिक्षण विभागाकडे गेला असता मानवतेच्या दृष्टीकोनातून त्या महिलेला ६ महिन्याची रजा मंजूर करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिक्षण विभागाचा आदर्श घेत इतरही विभागामध्ये असा सक्त नियम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२२-०३-२०१६) :(१), (२) व (३) राज्य शासकीय महिला कर्मचा-यांना surrogacy पध्दतीने जन्मलेल्या अपत्याच्या संगोपनासाठी बालसंगोपन रजा मंजूर करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २० जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर शासन निर्णय मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील महिला कर्मचा-यांनाही लागू आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथे पदवी प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष विनाअनुदानित तुकड्यांची वाढीव फी वाढ रद्द करण्याबाबत

(२४) ३०५३८ (२०-०१-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे पदवी प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष, तृतीय वर्ष विनाअनुदानित तुकड्यांची वाढीव फी वाढ रद्द करण्यात यावी यांसह अन्य मागण्यांसाठी एआयवायएफ विद्यार्थी संघटनेमार्फत विद्यापिठावर माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोर्चेकऱ्यांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत,
(३) तसेच सदर मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) होय.
(२) मोर्चेक-यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे
१) प्रथम व्दितीय व तृतीय वर्ष पदवीच्या विनाअनुदानित तुकड्याची फी वाढ रद्द करावी, या सर्व विद्यार्थ्यांना अनुदानित तुकड्यामध्येच प्रवेश द्यावा, विनाअनुदानित तुकड्याना अनुदान द्यावे.

२) मागील वर्षी आंदोलन केल्यानंतर वाढीव फीबद्दल पुनर्विचार करण्यासाठी समिती नेमली त्याचे पुढे काय झाले याबद्दल कळविले नाही.

३) महाविद्यालयातील सर्वच वर्षाचे प्रलंबित निकाल जाहिर करावेत, निकाल व परिक्षा प्रक्रिया MKCL कंपनीकडून काढून घेऊन पूर्वीच्या पध्दतीने करावी.

४) फी भरण्यासाठी दि.१३ ऑगस्ट, २०१५ ही अंतिम मुदत वाढवून ती ३० ऑगस्ट करावी.

५) महाविद्यालयातून सर्व विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाचा प्रवेश मिळावा व ही प्रक्रिया केंद्रीय पध्दतीने करावी.

(३) सदर मागण्याचे पत्र विद्यापरिषदेने नियुक्त केलेल्या शुल्क समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आले आहे. प्रस्तुत समितीच्या शिफारशींवर विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मान्यतेने संबंधितांना सदर शुल्क रचना ही तासिका तत्वातून शिक्षकांच्या मानधनावर होणारा खर्च व वरकरणी खर्च या दोन बाबी गृहीत धरुन निर्धारित केली आहे. सदर शुल्क आकारणी महाविद्यालयाने दोन संत्रामध्ये विभागून घ्यावी असे कळविण्यात आले आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वर्धा जिल्हा परिषदेतील समावेशीत शिक्षण विषयतज्ञ पदभरती घोटाळयाबाबत

(२५) ३०५४४ (२१-०१-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हा परिषदेतील समावेशीत शिक्षण विषयतज्ञ पदभरती घोटाळा प्रकरणी पर्यवेक्षक असलेले प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अहवालावरुन निलंबित केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षणाधिकारी यांना अटक करुन त्यांच्यावर गुन्हे नोंदविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१६-०३-२०१६) :(१) होय.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वर्धा यांनी दिनांक १९.०८.२०१५ रोजी पोलीस स्टेशन, वर्धा येथे क्रमांक ३७७/२०१५ कलम ४२०, ४६८, ४७१, ४०६ व ३४ या कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आठवी ते दहावीच्या संस्कृत पुस्तकात गंभीर चुका असल्याबाबत

(२६) ३१२१३ (२१-०१-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आठवी ते दहावीच्या संस्कृत पुस्तकात गंभीर चुका असल्याने विद्यार्थ्यांवर अशुध्द संस्कृत शिकण्याची वेळ आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर चुकांमुळे संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(३) उक्त विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२२-०३-२०१६) :(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंगोली-कोलगाव (ता.वणी) येथील वेकोलिच्या कोळसा खाणीमुळे धुळ आणि वायु प्रदुषणाने पिकांचे मोठे नुकसान होत असल्याबाबत

(२७) ३१४१० (१५-०१-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंगोली-कोलगाव (ता.वणी) येथील वेकोलिच्या कोळसा खाणीमुळे या परिसरातील साखरा, कोळगाव, माथोली, जुगाद टाकळी व चंद्रपूर जिल्ह्यातील विरुर बोरगाव ईरई येथे या खाणीतील धुळ आणि वायु प्रदुषणाने पिकांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांना हेक्टरी ८० हजारांची रुपयांची नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्याची मागणी असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील शेतकऱ्यांच्या मागणीवरुन शासनाने निर्णय घेवून त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२०-०४-२०१६) :(१) होय.

(२) मुंगोली खाण क्षेत्रातील साखरा, कोलगांव, माथोली, जुगाद, टाकळी, मुंगोली या गावातील पिकांचे नुकसानीबाबत कृषी विभागाचे अधिकारी तसेच डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठ अकोला येथील कृषी शास्त्रज्ञ यांनी पाहणी केली असून संबंधित गावातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत पिकांचे पंचनामे करुन पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील १५ शासकीय महाविद्यालय आणि रूग्णालयातील सुमारे २० वर्षांपासून कार्यरत असलेल्या ७७४ बदली कामगारांची सेवा नियमीत करणेबाबत

(२८) ३१६२२ (२२-१२-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारितील राज्यातील शासकीय महाविद्यालये व रुग्णालयातील प्रदीर्घ काम करणाऱ्या बदली/रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणेबाबत घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील १५ शासकीय महाविद्यालय आणि रूग्णालयातील सुमारे २० वर्षांपासून कार्यरत असलेल्या ७७४ बदली कामगारांना अद्यापही कायम करण्यात आले नसल्याने कामगार संघटनांनी मा.मुख्यमंत्री तसेच मा.शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे दि.७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले तसेच उक्त बदली कामगारांपैकी बहुतांशी कामगार निवृत्त होत असल्याने सदर कर्मचाऱ्यांना न्यायापासून वंचित राहावे लागत असल्याने सदर प्रकरणी तातडीने अंमलबजावणी करून बदली कामगारांना न्याय मिळवून देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :(१) व (२) विभागाच्या नियंत्रणाखालील एकुण १४ शासकीय महाविद्यालये व रुग्णालयातील वर्ग-४ संवर्गातील ७७४ बदली कर्मचाऱ्यांपैकी ६२६ पात्र बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा शासन निर्णय क्र. न्यायाप्र-०११५/प्र.क्र.३८/१५/वैसेवा-४, दि.७.१२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये नियमित करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी सुरु करण्यात आलेली "उपस्थिती भत्ता" योजना बंद करण्याच्या प्रस्तावाबाबत

(२९) ३१८४६ (२१-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये मुलींची फक्त नोंदणी न होता मुली प्रत्यक्षात उपस्थित राहाव्यात व गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी सुरु करण्यात आलेली "उपस्थिती भत्ता" ही योजना बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना बंद करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त योजनेला दुसरी पर्यायी नवीन योजना सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रस्तावित नवीन योजनेचे स्वरुप काय आहे व याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करणेत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०२-०३-२०१६) :(१) नाही.
(२), (३) च (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाने पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक मार्कांची अट शिथिल करण्याचा घेतलेला निर्णय

(३०) ३२३७९ (२८-१२-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाने पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक मार्कांची अट शिथिल करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाला बार कौन्सिल ऑफ इंडिया व ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशनची मान्यता घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्नोक्त बाब क्र.(१) व (२) नूसार शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) चौकशीच्या अनुषंगाने या निर्णयाच्या अध्यादेशाबाबतची कार्यवाही किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०३-२०१६) :(१) होय, हे खरे आहे. पारंपारिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक मार्काची अट काढून टाकण्याबाबत विद्यापीठाच्या विव्दत परिषदेमध्ये ठराव मंजूर करण्यात आला आहे. ज्या अभ्याक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीय परिषद शासनाने ठरवून दिलेल्या किमान गुणाची अट आहे असे अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम) यातून वगळण्यात आले आहेत.
(२) सदर निर्णयाला BCI/AICTE यांची मान्यता घेण्याची गरज नाही. कारण आवश्यक गुणांची अट पारंपारिक अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशासाठी काढून टाकण्यात आली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांना यातून वगळण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्रातील नागपूर येथे ऑल इंडिया इंन्स्टिटुट ऑफ मेडीकल सायन्स (एम्स) ची उभारणी होणार असल्याबाबत

(३१) ३२५१४ (२२-१२-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील नागपूर येथे ऑल इंडिया इंन्स्टिटुट ऑफ मेडीकल सायन्स (एम्स) ची उभारणी होणार असल्याचे माहे ऑक्टोबर २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले हे खरे काय,

(२) असल्यास, एम्स च्या उभारणीमुळे उत्तम आरोग्य सुविधा आणि उत्तम दर्जाचे वैद्यकीय तसेच नर्सिंगचे शिक्षण व इतर शिक्षणाची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार असून, स्थानिक हजारो युवकांना शिक्षण व रोजगार मिळणार आहे हे ही खरे काय,

(३) असल्यास, प्रत्येक एम्सच्या इमारतीत ९६० बेडचे सुसज्ज हॉस्पीटल, शैक्षणिक, प्रशासकीय इमारती, आयुष विभाग, नर्सींग कॉलेज, सभागृह, हॉस्टेल रात्रीच्या निवासाची सोय आदि सुविधा ही मिळणार आहेत हे ही खरे काय,

(४) असल्यास, एम्समध्ये निर्मितीसाठी १५७७ कोटी रूपयाची निधी राज्य शासनास मिळणार हे ही खरे काय,

(५) असल्यास, शासनाने या बाबत काही कृती आराखडा तयार केला आहे काय, व त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०२-२०१६) :(१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) एम्सकरिता राज्य शासनामार्फत आवश्यक जागा उपलब्ध करुन देण्यात येणार असून एम्सची उभारणी केंद्र शासनामार्फत करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील टी.बी. परिसरातील वार्ड क्र. ४२ ची दुरुस्ती करुन स्त्री रुग्णांकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत

(३२) ३२५२६ (१६-०१-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील टी.बी. परिसरातील वार्ड क्र. ४२ ची दुरुस्ती करुन स्त्री रुग्णांकरीता उपलब्ध करुन देण्याबाबतचे पत्र प्राध्यापक व विभाग प्रमुख क्षयरोग व उरोरोग विभाग विभाग, शा.वै.महा.नागपूर यांनी दिनांक २० एप्रिल, २०१५ ला पत्र क्र. क्षय/उरोराग/१३-१७/२०१५ ला सादर केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावात दुरुस्तीकरीता रु. ५५,५८,८३९ निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, रुग्ण महिलांना वार्ड क्र.४२ लवकरात लवकर उपलब्ध व्हावा यासाठी सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१८-०३-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) व (५) नाही.

वार्ड क्र. ४२ ची दुरुस्तीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संस्थेतील इतर वार्ड/विभागातील दुरुस्तीचा आढावा घेऊन एकत्रित एकच अंदाजपत्रक सादर करण्याबाबत संबंधित संस्थेस कळविण्यात आले आहे. संस्थेकडून प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

राज्यात कला व क्रिडा या विषयांस प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षण विभागाने शिक्षकांच्या वेतनावरील खर्च कमी करण्यासाठी कला, क्रिडा व शारिरीक शिक्षण विषय शिकविणा-या शिक्षकांच्या नेमणूका रद्द करुन मानधन न घेणारे अतिथी शिक्षक नेमण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत

(३३) ३२६८७ (२२-१२-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कला व क्रिडा या विषयांस प्रोत्साहन देणाऱ्या घोषणा करणा-या शिक्षण विभागाने शिक्षकांच्या वेतनावरील खर्च कमी करण्यासाठी कला, क्रिडा व शारिरीक शिक्षण विषय शिकविणा-या शिक्षकांच्या नेमणूका रद्द करुन मानधन न घेणारे अतिथी शिक्षक नेमण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कला, क्रिडा व कार्यानुभव या क्षेत्रात शहराचे वा गावाचे नाव उज्वल केलेल्या व्यक्तिंमधून मानधन न स्वीकारता शिकविणा-या व्यक्तींची निवड करण्यात यावी असे शासनाने आदेश काढले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मानधन न घेता काम करणारे शिक्षक न मिळाल्यास प्रति तास रु.५०/- प्रमाणे मानधन व महिन्याचे मानधन कमाल एकूण रु.२५००/- पेक्षा जास्त असता कामा नये असा आदेश काढल्यानुसार हे विषय शिकविण्यास शिक्षक न मिळाल्यास भविष्यात कला व क्रिडा क्षेत्रात विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास,प्रश्नोक्त भाग (२)व (३) बाबात शासन कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१६) :(१), (२) व (३) राज्यात कला, क्रिडा व कार्यानुभव हे विषय शिकविण्यासाठी ऐच्छिक/मानधन व स्वीकारता किंवा प्रतितास रु. ५० व माहे कमाल रु. २५००/- प्रमाणे मानधनावर अतिथी निदेशकांचे पॅनल तयार करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्हयातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुगणालयातील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी उभारण्यात आलेल्या प्रतिक्षालयात असलेला मुलभूत सुविधेचा अभाव

(३४) ३३३६२ (२०-०१-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)सोलापूर जिल्हयातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुगणालयातील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी प्रतीक्षालय उभारण्यात आलेले असून पुरुष-महिलांसाठी असलेल्या या दोन रुम व्यतीरिक्त प्रतीक्षालयात वीज, पाणी,स्वच्छता आदिंचा अभाव असल्याचे दिनांक १ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ अभियानाअंतर्गत आरोग्य निरोगी राहण्यासाठी उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (०९-०३-२०१६) :(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

व्दितीय वर्ष मायनॉरिटी इंजिनिअरिंग कॉलेजमधील मॅनेजमेंट कोटा पध्दतीस स्थगिती देवून, केंद्रीय (कॅप) पध्दतीने प्रवेश देणेबाबतच्या निर्णयास मान्यता देवून, सदर निर्णयाची १ जानेवारी २००९ पासून ते आतापर्यंत अंमलबजावणी करण्याबाबत

(३५) ३३६६९ (२०-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे डिसेंबर, २००८ रोजी वा त्यासुमारास विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात तत्कालिन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, श्री.राजेश टोपे यांनी व्दितीय वर्ष मायनॉरिटी इंजिनिअरिंग कॉलेजमधील मॅनेजमेंट कोटा पध्दतीस स्थगिती देवून, केंद्रीय (कॅप) पध्दतीने प्रवेश देणेबाबतच्या निर्णयास मान्यता देवून, सदर निर्णयाची १ जानेवारी २००९ पासून ते आतापर्यंत अंमलबजावणी करण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासननिर्णय अथवा विधानसभेच्या आश्वासनपूर्तीबाबत कोणताही उल्लेख नसल्याकारणाने शासनाने सदरहू बेकायदा मॅनेजमेंट कोट्यावरील स्थगिती तात्काळ उठविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भाने तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री महोदयांनी विधान परिषदेत दिलेल्या आश्वासनानुसार शासकीय, अशासकीय अनुदानित, खाजगी विनाअनुदानित अशा सर्व संस्थांमधील थेट द्वितीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या सर्व जागा (प्रथम वर्षात अनुत्तीर्ण झाल्यामुळे रिक्त जागा + लॅटरल एन्ट्रीद्वारा उपलब्ध झालेल्या अशा सर्व) केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेमार्फत भरण्याचे धोरण शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून अवलंबिण्यात आले आहे.

तथापि, अल्पसंख्याक संस्थांच्या बाबतीत संस्थेने निश्चित केलेल्या अल्पसंख्याक कोटयातील जागा त्या त्या अल्पसंख्याक समूहातील उमेदवारांमधून संस्थेला संस्थास्तरावर भरता येतात व अद्यापपर्यंत ही पध्दत सुरु आहे.

(२) शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषध निर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या सर्व रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत भरण्याच्या प्रवेश नियमास शासन निर्णय जीईसी-२००९/(१६/०९) तांशि-४, दिनांक २५/६/२००९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाचा संस्था स्तरावरील कोटा अनुज्ञेय करण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील उच्च माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविदयालय, विभाग तुकडया, वर्ग यांचे मुल्यांकन कामकाज करुन अनुदान प्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची यादी जाहीर करणेबाबत

(३६) ३४०१२ (२३-१२-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविदयालय, विभाग तुकडया, वर्ग यांचे मुल्यांकन कामकाज पूर्ण करुन अनुदान पात्र शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाची यादी जाहीर करावी व त्यासंबंधी अनुदानाची तरतूद करावी या मागणीबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री, मा.शिक्षणमंत्री यांचे कडे विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळा कृति समिती यांनी दिनांक १६ सप्टेबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१६) :(१) होय.
(२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावर तपासणी/छाननीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्व अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक विद्यापीठ लोणार (जि.रायगड) येथे मंजूर करण्याबाबत

(३७) ३४०६६ (२३-१२-१०१५). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)लोणार (जि.रायगड) येथे राज्यातील सर्व अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक विद्यापीठ मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विद्यापिठासाठी कुलगुरुची देखील नियुक्ती करण्यात आली असुन राज्यातील इतर विद्यापिठांमध्ये १० उपकेंद्र तांत्रिक विद्यापिठासाठी देण्याचे नियोजित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील १० विद्यापिठांमध्ये तांत्रिक विद्यापीठासाठी ५ एकर जागा देखील आरक्षीत करण्यात आली असुन मात्र अद्यापही तांत्रिक विद्यापीठ सुरु करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात तांत्रिक विद्यापीठ नसल्यामुळे मुंबई, पुणे सारख्या महत्वाच्या शहरांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळत नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त तांत्रिक विद्यापीठ तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) होय, हे अंशतः खरे आहे. डॉ.बाबासाहेब आंबडेकर तंत्रशास्त्र विद्यापीठ सन १९८९ रोजी ''महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९८९'' अन्वये 'एकाकी विद्यापीठ' स्थापन करण्यात आलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबडेकर तंत्रशास्त्र विद्यापीठाची स्थापना करणे, तसेच राज्यातील तंत्रशास्त्र अभ्यासक्रमाशी संबंधीत महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्नीत करण्याची तरतूद डॉ.बाबासाहेब आंबडेकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या स्थापनेबाबतच्या अधिनियमात केली आहे. तथापि, सदर अधिनियम अद्यापपर्यंत अधिसूचित करण्यात आलेला नाही.
(२) हे अंशतः खरे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या कुलगुरु पदी सध्या प्रभारी कुलगुरंची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठासाठी राज्यातील इतर विद्यापीठांमध्ये उपकेंद्रांसाठी प्रत्येकी ५ एकर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केलेली आहे.
(४) नाही.

(५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ कार्यान्वित करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्रीय निवासी योजना देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयांत लागू करण्याचा केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत

(३८) ३४२२५ (२२-१२-२०१५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयांत केंद्रीय निवासी योजना लागू करण्याचा निर्णय केंद्र शासनाने सन १९९२ साली घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तब्बल २२ वर्षे उलटूनही राज्यात या योजनेची कोणत्याही प्रकारे अंमलबजावणी झाली नसल्याची माहिती माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, उक्त योजनेची अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१०-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) राज्यात सेंट्रल रेसिडेन्सी स्किम सुरु करण्याबाबत प्रस्ताव तयार करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्या स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या शिफारशीनुसार प्रस्ताव संचालनालयाकडून प्राप्त झाला असून त्यानुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापुर विद्यापीठातील अभियांत्रिकीमध्ये शिकणा-या विद्यार्थांचे झालेले शैक्षणिक नुकसान

(३९) ३५२६२ (२३-१२-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर विद्यापीठामार्फत अभियांत्रिकी व्दितीय वर्षे थेअरी ऑफ मशीन(टॉम) विषयांच्या प्रश्न पत्रिकेत १०० पैकी ४० मार्काचे प्रश्न चुकीचे व अभ्यासक्रमा बाहेरचे समाविष्ठ केल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचे माहे जुलै, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,व तद् नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणुन शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०३-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे तथापि, विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही. सदर विषयाच्या प्रश्नपत्रिकेत ४० गुणांचे प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरील असल्यामुळे त्याबाबत परीक्षा मंडळाची तातडीची बैठक बोलावून त्यामध्ये सदरचा विषय ठेवला असता सदर विषयाची फेर परीक्षा घ्यावी व Best of Two नुसार निकाल जाहिर करावा असा निर्णय झाला त्यानुसार फेर परीक्षा दि. ०९/०८/२०१५ रोजी संपन्न होऊन सुधाति निकाल जाहिर करण्यात आला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामध्ये
नियमबाहय नेमणूका करण्यात आल्याबाबत

(४०) ३५५८५ (२३-१२-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामध्ये सन २००९ ते २०१५ दरम्यान अभियांत्रिकी विद्याशाखेत करीयर ॲडव्हांसमेंट/प्लेसमेंट मध्ये पदोन्नती देतांना एआयसीटीआय च्या निकषाचे उल्लघंन करून नियमबाहय पदोन्नती देण्यात आली असल्याची माहिती दिनांक ३० आक्टोंबर २०१५ रोजी व त्या सुमारास निर्देशनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बीसीयुडी विघापीठात प्रोफेसरपदा करीता पात्र नसतांना सुध्दा पात्र ठरवून त्यांची नियमबाहय नियुक्ती संचालक पदावर करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती शासनाने दोषीवर कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१६) :(१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मान्यता प्राप्त सार्वजनिक वाचनालयातील कर्मचाऱ्यांना अल्प मानधनावर काम करावे लागत असून उक्त मानधन वेळेवर मिळत नसल्याबाबत

(४१) ३५६२३ (२०-०१-२०१६). श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मान्यता प्राप्त सार्वजनिक वाचनालयातील कर्मचाऱ्यांना अल्प मानधनावर काम करावे लागत असून उक्त मानधन वेळेवर मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाचनालयाची वर्ग वाढ ही शासनाने बंद केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाचनालयातील कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन वाढविणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी वारंवार केलेली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मानधन वाढविणे तसेच वर्ग वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) नाही.

(२) प्रश्न भाग १ च्या विषयाशी सुसंगत नाही.

मा. मंत्रीमंडळाने पुढील आदेश होईपर्यंत कोणत्याही नवीन ग्रंथालयाला मान्यता देऊ नये व दर्जावाढ करु नये असा निर्णय घेतला आहे.

(३) होय.

(४) शासनाने ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ होण्यासाठी वारंवार अनुदानात वाढ केली आहे. मा. मंत्रीमंडळाने पुढील आदेश होई पर्यंत वर्ग वाढ करण्यात येऊ नये असा निर्णय घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सुवर्ण पदक विजेता कबड्डी खेळाडू श्री. नितीन शशीकांत मदने यांना महाराष्ट्र शासनाकडून आर्थीक मदत व गुणगौरवाबाबत

(४२) ३५९२० (२२-१२-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुवर्ण पदक विजेता कबड्डी खेळाडू श्री. नितीन शशीकांत मदने यांना महाराष्ट्र शासनाने आर्थीक मदत व गुणगौरव केला नाही याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी खानापूर यांनी मा.क्रीडा मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने सदर खेळाडूस आर्थिक मदत मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आहेत ?

श्री. विनोद तावडे (१६-०३-२०१६) :(१) होय.
(२) आशियायी क्रीडा स्पर्धामध्ये पदक प्राप्त खेळाडूना पारितोषीक देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उपराजधानीतील ८०० वैद्यकीय कामगारावर अन्याय होत असल्याबाबत

(४३) ३६२३८ (२०-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभागाने मा. न्यायालयीन आदेशानुसार रोजंदारी कामगारांना सेवेत समावुन घेण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोजंदारी कामगारांने किमान २४० दिवस सेवा केली असावी अशी अट घालण्यात आल्यामुळे ८०० कामगारांना कायम सेवेत सामावुन घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याकरीता काही अटी व शर्ती विहीत करण्यात आल्या होत्या. त्यानुसार बदली कर्मचाऱ्यांने प्रत्येक वर्षात एकुण २४० दिवस याप्रमाणे १० वर्ष सेवा केलेली असली पाहिजे. उपरोक्त अटी व शर्ती विचारात घेऊन शासनाने त्यानुसार एकुण ७७४ बदली कर्मचाऱ्यांपैकी ६२६ बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा दि. ७.१२.२०१५ अन्वये नियमित केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रसुत महिलेचे शवविच्छेदन करण्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर येथील अधिकाऱ्याचे टाळाटाळ होत असल्याबाबत

(४४) ३६२९९ (२०-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर येथील रुग्णालयात प्रसुती नंतर मृत्यु झालेल्या महिलेच्या शवविच्छेदनास तेथील अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय अधिक्षक, व पोलिस अधिकाऱ्यांच्या पुढाकाराने साडे चार तासानंतर शवविच्छेदन करण्यात आले , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शवविच्छेदन करण्यास नकार देणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील प्राथमिक शाळांमधील शिक्षण हक्क कायद्यान्वये प्रवेशाबाबत बैठक

(४५) ३७९०२ (२१-०१-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील प्राथमिक शाळांमधील शिक्षण हक्क कायद्यान्वये प्रवेशाबाबत बैठक दिनांक ०६ जुलै ते १० जुलै या कालावधीमध्ये घेण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुणे मनपाच्या शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिका-यांना दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठक न घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणीची जबाबदारी टाळणा-या अधिका-यावर शासनाने कोणती कारवाई केलेली आहे, वा करण्यात येत आहे?

श्री. विनोद तावडे (१७-०३-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक २२/८/२०१५ रोजी बैठक घेण्यात येऊन शाळांना प्रवेश देण्याबाबत निर्देश देण्यात आले असून प्रवेश न दिल्यास कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तदनंतर संबंधित शाळातून प्रवेश देण्यात आले आहेत.

पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेचा कालावधी हा सहा तासांवरुन आठ तास करण्याचा विचाराधीन प्रस्ताव

(४६) ३८४८३ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेचा कालावधी हा सहा तासांवरुन आठ तास करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१५ च्या दुस-या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच सदर प्रस्तावास विद्यार्थी-पालक, शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधींकडून मोठ्या प्रमाणावर हरकत घेण्यात येत असल्याने शासनाकडून या प्रस्तावाबाबत फेरविचार करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, फेरविचार न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०३-०२-२०१६) :(१) व (२) भारत सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणबाबत गाव, तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर चर्चा करुन ऑनलाईन अहवाल सादर करण्याचे राज्य शासनास निर्देश दिले होते. या अनुषंगाने तालुका, जिल्हा, व राज्य स्तरावर कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रांमध्ये प्राप्त सूचनांवर जनतेची मते जाणून घेण्यासाठी संकलित माहिती अपलोड करण्यात आलेली होती. त्यामध्ये शाळेच्या कालावधीबाबतच्या सूचनेस शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधीकडून हरकत घेण्यात आल्याने सदर सूचना वगळण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना 'कायम' शब्द वगळून सुमारे ३ वर्षांचा कालावधी लोटला तरी अनुदान देण्यात न आल्याबाबत

(४७) ३९४०० (२२-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना कायम शब्द वगळून सुमारे ३ वर्षांचा कालावधी लोटला तरीदेखील शासनाकडून अनुदान देण्यात येत नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू शाळांना तातडीने अुनदान देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) विहित निकषानुसार अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

रस्ता सुरक्षा व वाहन रस्त्याने चालविण्याचे नियम शालेय अभ्यास क्रमात समावेश करणेबाबत

(४८) ३९४०८ (२२-१२-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपघाताचे वाढते प्रमाण पाहता सुरक्षेच्या दृष्टीने व अपघात कमी होण्याचे दृष्टीने रस्ता सुरक्षा व वाहन रस्त्याने चालविण्याचे शिक्षण शैक्षणिक जीवनापासुन शालेय विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे, यास्तव हा विषय शिक्षण अभ्यासक्रमात घेणेबाबत मा. मंत्री, परिवहन यांना पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने सातत्य पडताळून पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१६) :(१) होय.

(२) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ मध्ये रस्ता सुरक्षा व वाहने रस्त्याने चालविण्याच्या नियमांचा पुढीलप्रमाणे अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. इयत्ता ५ वीच्या परिसर अभ्यास व इयत्ता १ ली ते ५ वी च्या कार्यानुभव या विषयात वाहतुक व संदेशवाहन या घटकांतर्गत रस्ता सुरक्षेविषयी माहिती देण्यात आली आहे. इयत्ता ७ वी व ८ वीच्या कार्यानुभव या विषयात आपत्ती व्यवस्थापन या घटाकांतर्गत या विषयाचा समावेश करण्यात आला आहे. इयत्ता ९ वी साठी असलेल्या नागरी संरक्षण व वाहतुक सुरक्षा या वैकल्पिक गटातील विषयाच्या शिक्षक हस्तपुस्तिकेमध्ये रस्ता सुरक्षा व वाहन चालविण्याचे नियम या बाबींचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शैक्षणिक अभ्यास क्रमात पर्यावरण व प्रदुषण विषयाचा समावेश करणेबाबत

(४९) ३९४२४ (२२-१२-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह देशातील प्रदुषणाचे वाढते प्रमाण पाहता या विषयाचे ज्ञान आपण जाहीरातीच्या माध्यमातून अनपेक्षीत खर्च करुन देतो व यांचा आवश्यक परिणाम होत नाही म्हणून हया विषयाचे ज्ञान शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षापासूनच अभ्यास क्रमात समाविष्ट करण्याबाबतचे निवेदन मा.मंत्री पर्यावरण यांना दिनांक १ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१६) :(१) सदरचे निवेदन मा.मंत्री (पर्यावरण) यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

(२) महाराष्ट्र राज्यात सन २००५ पासून पर्यावरण हा विषय अनिवार्य आहे. तथापि, सन २०१२ पर्यंत स्वतंत्ररित्या शिकविला जाणारा हा विषय त्यानंतर शालेय स्तरावर एकात्मिक पध्दतीने शिकविला जात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्हा परिषदेतील प्रभारी गट शिक्षण अधिकारी यांच्या मनमानी व जुलमी कारभाराबाबत

(५०) ३९४२६ (२२-१२-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेतील प्रभारी गट शिक्षण अधिकारी यांच्या मनमानी व जुलमी कारभाराबाबत तेथील महिला शिक्षिकेने दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास

मा.शिक्षण मंत्री, आदिवासी विकास मंत्री, मुख्य सचिव व प्रधान सचिव ग्रामविकास - मुख्य कार्यकारी अधिकारी पालघर जिल्हा परिषद यांचेकडे आठ वेळा तक्रार अर्ज दाखल केल्या नंतरही कारवाई झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत संबंधीत दोषी अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१६) :(१) नाही.

(२) या प्रकरणी संबंधित प्रभारी गट शिक्षण अधिकारी व विस्तार अधिकारी श्री.विलास पिंपळे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी त्यांचे आदेश क्र. जिपपा/शिक्षण/आस्था-१/ वशी १०६८, दिनांक २४.०७.२०१५ अन्वये निलंबित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.